फुलशेती

# ‘डेलिया’ मिळवून देईल नफा



**प्रा. भूषण तायडे**
(मो.नं. ९७६६८०८३२४)
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक



डेलियाची लागवड विविध प्रकारच्या जमिनीत करता येते. डेलियाच्या लागवडीसाठी उत्तम निचरा होणारी, मध्यम पोताची आणि ६.५ ते ७.५ सामू असलेली जमीन योग्य असते. जमिनीत सेंद्रिय द्रव्यांचे भरपूर प्रमाण असल्यास पाण्याचा उत्तम निचरा होतो. त्यामुळे आवश्यक तेवढे पाणी जमिनीत राहते, जमीन घट्ट होत नाही व कंदाची वाढ मोकळी सुटसुटीत होते.

**डे**लिया या फुलझाडाचे उगमस्थान मेक्सिको हा देश आहे. प्राचीन काळापासून डेलियाच्या फुलांचा उपयोग देवपूजेसाठी केला जातो. फुलाचा आकर्षक आणि नाजुकपणा या दोन बाबींमुळे परदेशी फुलांमध्ये डेलियाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या फुलझाडाला डॉ. ॲण्ड्रिओस डेल या स्वीस वनस्पतीशास्त्रज्ञाच्या सन्मानार्थ १७९१ मध्ये दहलिया हे नाव देण्यात आले. परंतु आपल्याकडे डेलिया हेच नाव जास्त प्रचलित आहे.

डेलिया फुलझाडाची बागेत किवा कुंड्यांमध्ये लागवड करता येते. ही फुले प्रदर्शनात मांडण्यासाठी, बागेची शोभा वाढविण्यासाठी आणि गृहसजावटीसाठी उपयोगात येतात. यामुळे आज बहुतेक शहरांत, बागेत आणि घरांत डेलियाची लागवड दिसून येते. डेलियाचा ठेंगणा प्रकार प्रामुख्याने



वाफ्यात, प्लॉटच्या किनारीवर इतर फुलझाडांबरोबर मिश्र किनारीमध्ये लावतात.

डेलिया या फुलझाडाचा उपयोग काही प्रमाणात औषधी व पोषक अन्नद्रव्य म्हणून केला जातो. या फुलझाडाच्या कंदामध्ये इन्सुलिन आणि फ्रुक्टोज ही पोषक अन्नद्रव्ये तसेच काही प्रमाणात फायटिन आणि बेंझोईक आम्ल हे औषधी घटक असतात.

**हवामान** : डेलियाच्या झाडाची वाढ मोकळ्या आणि सूर्यप्रकाशाच्या जागेत चांगली होते. परंतु जोराच्या मोकाट वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी या फुलझाडाला आडोसा तयार करावा. झाडाच्या योग्य वाढीसाठी वातावरण थंड आणि धुकेविरहित असावे लागते.

डेलियाच्या झाडाच्या वाढीवर आणि फुलधारणेवर दिवस व रात्रीचे तापमान आणि दिवसाची लांबी यांचा परिणाम होतो. काचगृहात निरनिराळ्या हंगामात डेलियाची लागवड केली असता हिवाळ्यात रात्रीचे तापमान १० ते २१ अंश सेल्सियस असताना आणि उन्हाळ्यात तापमान १५.६ ते २६.७ अंश सेल्सियस असताना या फुलझाडाला कळ्या लागतात.

**जमीन** : डेलियाची लागवड विविध प्रकारच्या जमिनीत करता येते. डेलियाच्या लागवडीसाठी उत्तम निचरा होणारी, मध्यम पोताची आणि ६.५ ते ७.५ सामू असलेली जमीन योग्य असते. जमिनीत सेंद्रिय द्रव्यांचे भरपूर प्रमाण असल्यास पाण्याचा उत्तम निचरा होतो. त्यामुळे आवश्यक तेवढे पाणी जमिनीत राहते आणि जमीन घट्ट होत नाही व कंदाची वाढ मोकळी सुटसुटीत होते.

**जाती** : डेलियाच्या फुलाची रचना ही सूर्यफुलाप्रमाणे असते. फुलाच्या कडेला लहान आकाराची असंख्य किरण फुले (रे फ्लोरेट) असतात. ही नरफुले असतात. या पाकळ्या विविध रंगाच्या असतात. फुलाच्या मध्यभागी तबकडी फुले (डिस्क फुले) असतात. डेलियाच्या फुलातील किरण फुले आणि तबकडी फुले यांच्या संख्येवरून डेलियाच्या जातींचे विविध प्रकार पडतात.

### विविध प्रकारांचा संकर

डेलियाचे अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये संकर करून विविध नवीन प्रकार निर्माण करण्यात आले. इंग्लंडमधील रॉयल हॉर्टिकल्चर सोसायटी आणि नॅशनल डेलिया सोसायटी यांनी डेलियाच्या आधुनिक जातींचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

१. सिंगल फ्लॉवर्ड डेलिया
२. स्टार फ्लॉवर्ड डेलिया
३. अनिमोन फ्लॉवेर्ड डेलिया
४. कोलेरिट डेलिया
५. पीओनी डेलिया
६. डेकोरेटीव फ्लॉवर्ड डेलिया
७. कॅक्टस डेलिया
८. सेमी कॅक्टस डेलिया
९. बॉल डेलिया
१०. पोम्पोन डेलिया
११. फिम्ब्रिएटेड डेलिया

**अभिवृद्धी** : डेलियाची अभिवृद्धी बी, कंदमुळे, खोडाचे छाट अशा प्रकारे करता येते याशिवाय भेट कलम पद्धतीने डेलियाची झाडे करता येतात.

**हंगाम व लागवड** : डेलियाची लागवड वर्षातून दोन हंगामात करता येते. पावसाळी लागवड जून महिन्याच्या सुरवातीला करावी म्हणजे ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात

फुले मिळतात. डेलियाची हिवाळी लागवड ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये करावी. या लागवडीपासून फेब्रुवारी–मार्चमध्ये फुले मिळतात. मैदानी प्रदेशात बियांची पेरणी सप्टेंबर – ऑक्टोबर महिन्यात आणि पहाडी प्रदेशात मार्च–एप्रिल महिन्यात करावी.

डेलियाची लागवड कुंडीत करताना एका कुंडीत प्रकारानुसार डेलियाची २ किंवा ३ रोपे अथवा कंद लावावेत. डेलियाची जमिनीत लागवड करताना दोन ओळींतील अंतर ६० ते १०० सें.मी. ठेवावे तर दोन रोपांतील अथवा कंदांतील अंतर ३० ते ५० सें.मी. इतके ठेवावे.

## खते व पाणी

डेलियाचे व्यापारी पीक घेण्यासाठी पुरेशा प्रमाणात खते देण्याची आवश्यकता असते. जमिनीच्या पूर्वमशागतीच्या वेळी भरपूर प्रमाणात सेंद्रिय खत, चांगले कुजलेले शेणखत तसेच दर चौरस मीटर जागेसाठी १०० ग्रॅम हाडांचा चुरा किंवा सुपरफॉस्फेट मिसळावे. डेलियाचे चांगले उत्पादन मिळविण्यासाठी दरहेक्टरी १०० किलो नत्र, १२५ किलो स्फुरद आणि पालाश या प्रमाणात खते द्यावीत. यापैकी नत्राची अर्धी मात्रा आणि स्फुरद व पालाशची पूर्ण मात्रा लागवडीपूर्वी जमिनीत मिसळावी. त्यानंतर ४० दिवसांच्या अंतराने नत्राची उर्वरित मात्रा पिकाला द्यावी.



डेलियाला नियमित परंतु भरपूर पाण्याची आवश्यकता असते. कोरड्या हवामानाच्या काळात झाडांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. डेलियाला जास्त पाणी दिल्यामुळे झाडे झपाट्याने वाढतात. मात्र झाडांची पालेदार वाढ जास्त होते. कंद कमजोर राहतात. झाडांना कळ्या कमी लागतात आणि त्या फुलण्यापूर्वी सुकतात. म्हणून डेलियाला आवश्यकतेनुसार पाणी द्यावे.

## आंतरमशागत

डेलियाच्या पिकांमध्ये आंतरमशागतीची विविध कामे करावी लागतात.

१ झाडांना आधार देणे : डेलियाच्या झाडांची वाढ जोमाने होऊ लागल्यावर झाडाला मजबूत आधार देण्याची आवश्यकता असते. त्यासाठी बांबूच्या कामट्या वापरतात.

२ झाडांची वाढ रोखणे : डेलियाची झाडे २५ ते ३० सें.मी. उंच वाढल्यावर आणि प्रत्येक झाडावर ४ ते ६ निरोगी पानांच्या जोड्या आल्यावर झाडांची वाढ थांबवावी लागते. त्यासाठी प्रत्येक झाडाचा शेंडा खुडून टाकावा लागतो. झाडांची वाढ थांबविण्याचा मुख्य उद्देश हा भरपूर फुलधारणा होणे हा असतो.

३ तणांचे नियंत्रण : डेलियाच्या लागवडीत आच्छादन (मल्चिंग) करणे महत्त्वाचे असते. आच्छादनाच्या वापरामुळे जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी होते. त्यामुळे पिकांना पाणी देण्याची गरज कमी होते. तसेच पिकातील तणांची वाढ देखील कमी होते.

## किडी व रोग

**मावा :** ही कीड डेलियाच्या झाडांच्या पानांच्या पेशींमधून रस शोषण करते.

उपाय : १० लि. पाण्यात १० मि.लि. मॅलॅथिऑन (५०% प्रवाही) किंवा १० मि.लि. रोगार (३०% प्रवाही) या प्रमाणात मिसळून पिकावर फवारावे.

**पाने खाणाऱ्या अळ्या :** या अळ्या पाने, कळ्यांची टोके व फुलांचे भाग खातात.

उपाय : डेलियाच्या झाडावर दरहेक्टरी २० किलो सेविन (१०%) किंवा कार्बारिल किंवा फॉलिडॉल (१०%) या कीटकनाशकाची भुकटी आठ दिवसांच्या अंतराने धुरळावी.

**लाल कोळी :** या किडीच्या नियंत्रणासाठी १० लि. पाण्यात १४ मि.लि. मोनोक्रोटोफॉस किंवा १० मि.लि. मॅलॅथिऑन मिसळून झाडावर फवारावे.

**मर रोग :** प्रामुख्याने हा रोग बुरशीमुळे होतो. यासाठी रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावी.

**भुरी :** या रोगाच्या नियंत्रणासाठी १० लि. पाण्यात २० ग्रॅम बाविस्टिन (५०%) किंवा २१ ग्रॅम कॅराथेन (४८%) या प्रमाणात मिसळून फवारणी करावी.

## फुलांची काढणी

डेलियाच्या फुलांची काढणी पहाटे अथवा सकाळी लवकर करावी. झाडावरील फुलांची काढणी करताना जास्तीत जास्त लांब दांडा ठेवून कापणी करावी. कापलेली फुले पाण्याने अर्धी भरलेल्या प्लॅस्टिकच्या बादलीत त्वरित ठेवावीत. फुले भरलेली बादली फुलांचे पॅकिंग करण्यापूर्वी थंड व अंधाऱ्या जागी ठेवावी. ■